# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १९२** **दिनांक १५/०७/२०२१**

## फसवणुक करणा-या दोन महीला आरोपी अटकेत व ५१,०००/- रुपयांचा सोन्याचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक ०३/०७/२०२१ रोजी ११.२० वा. भुषण हॉस्पीटल समोरील सिग्नलकडून डी-मार्टकडे जाणा-या रोडवरील लिंकरोडवरील मटण शॉपच्या बाजुस कच्या रोडवर विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर येथे दोन अनोळखी स्त्रियांनी त्यांचे ताब्यातील सोन्यासारखे दिसणारे मणी जास्त किंमतीचे असल्याचे यातील फिर्यादी यांना भासवून फिर्यादी यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र, कानातील सोन्याची डुले व ५०० रुपये घेवुन तसेच फिर्यादी यांच्या हातात त्यांच्याकडील नकली काळपट पडलेली सोन्यासारख्या धातुचे मणी देवुन फसवणुक केली, म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादिवरुन विरार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५६७/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचे तपासादरम्यान तांत्रिक बाबींचा आधार घेवून आरोपींची गुन्हा करण्याची कार्यपध्दती आणि बातमीदाराने दिलेल्या माहितीवरुन दोन महीला आरोपी नामे १) गिता रमेश कांग्या वय ४३ वर्षे रा- भाव पालीताना, जिल्हा - भावनगर, राज्य- गुजरात व २) आशा मंगल सरव्या वय ३८ वर्षे रा- ढोला टिंबी, ता. अमरेली, जिल्हा- भावनगर, राज्य गुजरात अशांना विरार येथून ताब्यात घेवून त्यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासामध्ये त्यांचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे. तपासादरम्यान सदर आरोपितांकडून खालीलप्रमाणे गुन्हयात गेला माल हस्तगत करण्यात आला आहे.

१) ४५,०००/- रुपये कि.चे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र
२) ६०००/- रुपये किमतीचे सोन्याचे कानातील डुले.
-----------------
५१,०००/- रु एकुण

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३, श्रीमती रेणुका बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली विरार पोलीस स्टेशनचे वपोनि. श्री. सुरेश वराडे, गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस उप निरीक्षक अभिजीत भुपेंद्र टेलर, संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, पो.ना. विजय दुबळा, हर्षद चव्हाण, भुषण वाघमारे, संदिप शेरमाळे, पो.शि. सुनिल पाटील, इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सागर घुगरकर, पवन पवार यांनी केली आहे.

*********